# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९२४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com


क्र. मजीप्रा/सस/आस्था-४/८४३ दिनांक : ४ जून, २००४

विषय : **दिनांक २६ मे, २००४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९७ व्या सभेचे इतिवृत्त.**

दिनांक २६ मे, २००४ रोजी दुपारी ३.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९७वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबंत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

**( दीपक भसाळे )**
**सदस्य सचिव**

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व.विभाग**

**मा. मंत्री,**
**ग्रा.वि., पा.पु. व स्व.**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.**

10.6.2004

T.C.M.45

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रौप्य महोत्सवी वर्ष
१९७९-२००४

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस(प्र)/बैठक-९७/(१२५)/आ-४. दिनांक : १४.६.२००४

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
अपर मुख्य सचिव, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१

**विषय :** बुधवार दिनांक २६ मे, २००४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९७ व्या सभेचे इतिवृत्त..

महोदय,

दिनांक २६ मे, २००४ रोजी झालेल्या प्राधिरकणाच्या ९७ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यात येत आहे.

वरील इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत. म्हणजे ते प्राधिकरणाच्या पुढील सभेत विचारासाठी ठेवण्यात येतील.

आपला,

( शेखर गायकवाड)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**सोबत :** इतिवृत्ताची प्रत
पृष्ठ क्र.१ ते १०

प्रत :

सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांच्या माहितीसाठी.
मुख्य अभियंता, (कोकण विभाग) म.जी.प्रा., ठाणे.

प्रत,

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रम बाब क्र. ३,४,६,१० व आयत्या वेळची कार्यक्रम बाब एक मधील (१ ते ९) वर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ततेचा अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

अधीक्षक अभियंता, (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभगाशी संबंधीत असलेल्या पुढील कार्यक्रम बाब क्र. १० व आयत्या वेळची कार्यक्रम बाब एक मधील (१ ते ९) वर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

अधीक्षक अभियंता, मुख्यालय, म.जी.प्रा., नवी मुंबई / मुंबई.

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभगाशी संबंधीत असलेल्या पुढील कार्यक्रम बाब क्र. २,९ व आयत्या वेळची कार्यक्रम बाब एक मधील (१ ते ९) वर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

अधीक्षक अभियंता, म.नि. सं. व सं. मंडळ, म.जी.प्रा. नवी मुंबई.

उप मुख्य लेखा अधिकारी - १/२/३, म.जी.प्रा., नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा.,नवी मुंबई यांना कळविण्यांत येते की, कार्यक्रम बाब क्र.२ वर कारवाई करावी व कार्यपूर्ती अहवाल पाठवावा.

प्रशासकिय-नि-आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई यांना कळविण्यांत येते की, कार्यक्रम बाब क्र.८ वर कारवाई करावी व कार्यपूर्ती अहवाल पाठवावा.

कक्ष / कार्यासन अधिकारी, आस्थापना-१/२/३/४/५/६/७.

आपल्या कक्षासंबंधी असलेल्या संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरीत कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल आ-४ शाखेकडे पाठवावीत.

nng..Sabha..

(४)

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९७ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९७ वी सभा मा. मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६ मे, २००४ रोजी दूपारी ३.०० वाजता विधानभवनातील समिती कक्षात संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अजित पवार, मा. मंत्री, ग्रा.वि., पा.पु.व स्व. तथा मजीप्राचे अध्यक्ष.
२. श्रीमती सुलेखाताई कुंभारे, मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा.
३. श्री. सुनिल तटकरे, मा. राज्य मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४. श्री. बी. सी. खटुआ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व., मंत्रालय, मुंबई, तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५. श्री. नानासाहेब पाटील, प्रधान सचिव (२), नगरविकास, मंत्रालय, मुंबई, तथा प्राधिकरणाचे सदस्य.
६. श्री. एस. एस. हुसेन, प्रधान सचिव, ग्रा.वि.वि. मंत्रालय, मुंबई, तथा प्राधिकरणाचे सदस्य.
७. श्री. दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. अ. बा. सावंत, वि.स. व मु. ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
२. श्री. एस. व्ही. दहासहस्त्र, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
३. श्री. शेखर गायकवाड, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
४. श्री. वेंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
५. श्री. द. चि. सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई.
६. श्री. बी. एस. पाटील, उप-मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. क. दि. आडिवरेकर, उप-सचिव, प्रतिनिधी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

मा. मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९६ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २६ जानेवारी, २००४ रोजी झालेल्या मजीप्राच्या ९६ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९६ व्या सभेतील निर्णयांवर करण्यात आलेली कृती.**

या कार्यक्रमबाबीतील मुद्यांवर चर्चा करत असताना पुणे येथील मजीप्राची जागा **बांधा, वापरा व हस्तांतरीत करा** या तत्वावर विकसीत करणे या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीस खुपच विलंब होत असल्याने मा. अध्यक्ष महोदयांनी या जागेचे स्पेशल मोजणी करुन १५ दिवसांत प्रलंबीत कार्यवाही पूर्ण करावी व नकाशे तयार करण्यात यावेते अशा सूचना दिल्या. तसचे ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी लागणारे सी.आय. व डी.आय. पाईप्स त्वरीत प्राप्त करुन घेऊन प्रलंबीत कामे प्राधान्याने मार्गी लावावीत अशाही सूचना त्यांनी दिल्या. रोहा पाणी पुरवठा योजनेसाठी लागणारे पाईप्स सर्व प्रथम प्राप्त करुन घ्यावेत व योजना कार्यान्वित करावी अशी सूचना मा. उपाध्यक्ष श्री. तटकरे यांनी केली. या व्यतिरिक्त उर्वरित मुद्यांबाबतची करण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : म.जी.प्रा.चे सन २००३ व २००४ चे सुधारीत अंदाज व सन २००४-०५ चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

म.जी.प्रा.चे अंदाजपत्रक महसुली व भांडवली या दोन भागात विभागलेले असून सन २००३-०४ या वर्षातील प्राधिकरणाच्या कामकाजाच्या परिणामी रुपये ५.६१ कोटी रकमेची तूट दिसते. तसेच दि. ३१.३.२००४ अखेर स्थानीक स्वराज्य संस्थाकडे कर्ज परतफेडीपोटी व पाणीपट्टी, विलंब आकार, देखाभाल दुरूस्ती, लोकवर्गणी इत्यादीपोटी अनुक्रम रुपये ६५७.९० कोटी व रुपये ९३६.०५ कोटी थकबाकी प्रलंबित आहे. थकबाकीची वसुली आशादायक नाही ही बाब वि.स. व मु.ले.अ. यांनी स्पष्ट केली. त्यामुळे निर्भय योजना (थकबाकी) तसेच सन २००३-०४ चा सुधारीत कार्यभार सुमारे रुपये ७५५.६३ कोटी असून सन २००४-०५ चा कार्यभार रुपये १३५१.७० कोटी अंदाजीत केलेला आहे व सन २००३-०४ चे मुळ तसेच सुधारीत अंदाजपत्रक व सन २००४-०५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक खालीलप्रमाणे असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

### महसुली जमा व खर्चाचा गोषवारा

| महसुली जमा (रुपये लाखात) | | | महसुली खर्च (रुपये लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|
| मूळ अंदाज | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
| २००३-०४ | २००३-०४ | २००४-०५ | २००३-०४ | २००३-०४ | २००४-०५ |
| २८३९९.९३ | २२६६७.२६ | २३५१४.७६ | २८३९९.९३ | २३२२८.१० | २३४६०.३७ |

### भांडवाली जमा व खर्चाचा गोषवारा

| भांडवली जमा (रुपये लाखात) | | | भांडवली खर्च (रुपये लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|
| मूळ अंदाज | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
| २००३-०४ | २००३-०४ | २००४-०५ | २००३-०४ | २००३-०४ | २००४-०५ |
| ९४६४८.८१ | ७५५६२.९४ | १३५१६९.६३ | ९४६४८.८१ | ७५५६२.९४ | १३५१६९.६३ |

या सर्व माहितीची नोंद घेण्यात येऊन खालीलप्रमाणे प्राधिकरणाचे सन २००३-०४ चे सुधारित अंदाज व सन २००४-०५ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज मान्य करण्यात आले.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र. | तपशील | सन २००३-०४ चे सुधारित अंदाज | सन २००४-०५ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १. | महसुली जमा | २२६६७.२६ | २३५१४.७६ |
| २. | महसुली खर्च | २३२२८.१० | २३४६०.३७ |
| ३. | भांडवली जमा | ७५५६२.९४ | १३५१६९.६३ |
| ४. | भांडवली खर्च | ७५५६२.९४ | १३५१६९.६३ |

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : म.जी.प्रा.च्या मालकीच्या न्हावा शेवा प्रकल्प व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा सन २००४-०५ साठी आढावा.**

दिनांक ३१.३.२००४ अखेर प्राधिकरणाकडून २९ पाणी पुरवठा योजना चालविलेल्या जातात. यापैकी १ योजना जागतिक बँक प्रकल्प, टप्पा-१ या क्षेत्रात (अंबरनाथ-बदलापूर) व १ योजना न्हावा-शेवा प्रकल्प क्षेत्रात असून उर्वरित २७ योजना प्रकल्प क्षेत्राबाहेरील म्हणजे सर्व महाराष्ट्रभर पसरलेल्या आहेत. त्यानुसार क्षेत्रानिहाय पाणी पुरवठा जमा-खर्च लक्षात घेऊन पाणी दर ठरविले जातात हे वि.स. व मु.ले.आ यांनी नमूद केले. या क्षेत्रांप्रमाणे पाणीपट्टीचे दर निश्चित करत असताना देखभाल दुरूस्ती खर्च, घसारा, कर्ज परतफेडीची रक्कम, इत्यादी बाबी विचारात घेण्यात येतात. प्रकल्प क्षेत्राबाहेरील दर पुल रेट (Pool Rate) पध्दतीने निश्चित केले जातात. विद्यमान दराने न्हावाशेवा पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी रुपये १४२७.७४ लक्ष आधिक्य अपेक्षित असून अंबरनाथ-बदलापूर पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी रुपये ७३५.३२ लक्ष आधिक्य अपेक्षित आहे. तसेच प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी सुमारे रुपये ८३२.५५ लक्ष अधिक्य अपेक्षित आहे. हे आधिक्य (Accrued Basis) वर असले तरी प्रत्यक्ष वसुलीत काही प्रमाणात आधिक्य निश्चितच असणार. या बाबी विचारात घेता पाणीपट्टीच्या विद्यमान दरामध्ये वाढ करण्याची आवश्यकत नसल्याची बाब स्पष्ट करण्यात आली. या सर्व माहितीची नोंद घेण्यात येऊन सन २००४-०५ वर्षासाठी मजीप्राच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणच्या पाण्याच्या दरात वाढ न करण्याचे मान्य करण्यात आले, मात्र **पाणीपट्टीच्या वसुलीसाठी गती देण्यात यावी अशाही सूचना देण्यात आल्या. तसेच, चालू येणे किमान ९०% वसुली व थकबाकी किमान ५०% व्हावी या दृष्टीने संबंधित कार्यालय प्रमुखांना उद्दीष्टदेऊन व जबाबदारी ठरवून पूर्ततेबद्दल निर्देश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**कार्यक्रम बाब क्र. ५ : म.जी.प्रा.चे सन २००१-०२ या वर्षाचे वार्षिक अहवालाबाबत.**

मजीप्राचा सन २००१-०२ चा वार्षिक अहवाल मान्यतेसाठी सादर करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. या वार्षिक अहवालाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन अहवालास मान्यता देण्यात आली. हा अहवाल विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करणेसाठी सदस्य सचिव, मजीप्रा, यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : म.जी.प्रा.च्या सन २००१-०२ या वार्षिक लेखा परिक्षण अहवाल मंजूरीबाबत.**

मजीप्राचे सन २००१-०२ या वर्षाचे लेखे दिनांक २९.३.२००२ रोजी झालेल्या ९४ व्या सभेत स्वीकृत झाले आहेत. महालेखापाल लेखा परिक्षण, मुंबई यांनी या वार्षिक लेख्यांचे परिक्षण करुन त्यांचे पत्र क्र. Repor-III/MJP/AR-२००३-०२/६२०, दिनांक ९.१०.२००३ अन्वये अंतिम लेखा परिक्षण अहवाल प्रमाण पत्रासह सादर केले आहे. लेख्यांच्या स्थितीबाबत मा. अध्यक्षांनी विचारणा केली. त्यावर मा. प्रधान सचिवांन, पा.पु. व स्व.वि. यांनी सभेस विदीत केले की, सन २०००-२००१ च्या लेख्याबाबत प्रतिकूल अभिप्राय होते. परंतु, त्यानंतर लेख्यातील प्रलंबित बाबीचा निपटारा करण्याबद्दल प्राधान्याने वित्त विभागाने कार्यवाही केल्याने स्थिती (सुमारे रु.१२५ कोटीचा निपटारा) सुधारली व परिणामी २००१-०२ चे प्रमाणपत्र प्रतिकूल अभिप्रायविना आहे. वि.स.व मु.ले.अ. यांनी पुढे असेही सादर केले की, सन २००३-०४ च्या लेख्यामध्ये हा निपटारा आणखी सुमारे रु.९० कोटी एवढा होईल. या स्थितीबाबत मा. अध्यक्षांनी व सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

त्यानंतर वि.स. व म.ले.अ. यांनी सभेस महालेखापाल-१, मुंबई यांच्याकडून प्राप्त अंतिम लेखा परिक्षण अहवालाच्या अनुपालनाबद्दल विदीत केले व अनुपालन अहवाल प्राधिकरणाच्या मंजुरीकरिता सादर केला. या मंजूरीनंतर प्रमाणीत लेखे व लेखा परिक्षण अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहाकडे सादर करण्यात येणार आहे. ही बाब स्पष्ट करण्यात आली. या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन निलंबन लेखा शिर्षाखाली शिल्लकीची निपटारा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन सन २००१-०२ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास व त्यावरील अनुपालनास मान्यता देण्यात आली. सन २००१-०२ वर्षाचे लेखे व त्यावरील लेखापरिक्षण अहवाल विधान मंडळाच्या दोन्ही समभागृहापुढे सादर करण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा, यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : वित्त व लेखा संवर्गातील गट अ व ब ची पदे तसेच प्रशासकीय शाखेतील गट ब ची पदे लोकसेवा आयोगामार्फत भरणेबाबत.**

प्राधिकरणाचा प्रशासकीय कारभार शासनाच्या नियमानुसार व कार्यप्रणालीनुसार सुरू आहे. प्राधिकरणातील तांत्रिक शाखा, वित्त शाखा व प्रशासकीय शाख यांच्या अस्थापनेसाठी सेवा शर्तीबाबत शासनाचे नियम लागू आहेत. मजीप्राच्या अभियंता श्रेणी-१ व २ या पदावरील

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचार विनीमय करुन करण्यात येते त्याच धर्तीवर वित्त व लेखा शाखेतील गट अ व ब संवर्गामध्ये वरिष्ठ लेखा अधिकारी (कनिष्ठ), लेखा अधिकारी / लेखा परिक्षण अधिकारी आणि प्राधिकरणाच्या प्रशासन शाखेतील कक्ष अधिकारी / विशेष अधीक्षक ही नाम निर्देशनाची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात यावीत या प्रस्तावास मान्यता मिळावी म्हणून ही कार्यक्रम बाब सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन मजीप्रा अधीनियम-१९७६ मधील नियम-८(१-ब) मध्ये पुढीलप्रमाणे अंतर्भूत करण्यात यावे यास मान्यता देण्यात आली. **वित्त व लेखा शाखेतील गट अ व ब संवर्गामध्ये वरिष्ठ लेखा अधिकारी (कनिष्ठ), लेखा अधिकारी / लेखा परिक्षण अधिकारी आणि प्राधिकरणाच्या प्रशासन शाखेतील कक्ष अधिकारी / विशेष अधीक्षक ही नाम निर्देशनाची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात यावीत असा निर्णय घेण्यात आला.** तसेच याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे व त्यास मान्यता घेणे यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा, यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील वाहनांच्या वापरासंबंधीचे धोरण.**

शासन निर्णय वित्त विभाग क्र.वाहन-१००१/प्र.क्र.६५/२००१/विनिमय, मंत्रालय, दिनांक १०.९.२००१ अन्वये शासकीय व इतर कार्यालयामध्ये वाहनांच्या वापरासंबंधी धोरण निश्चित केले आहे.

मजीप्राने उक्त शासन निर्णयाच्या आधारे मजीप्राचे जे वाहन धोरण निश्चित केले आहे त्याची माहिती या कार्यक्रम बाबीव्दारे स्पष्ट करण्यात आली. या वाहन धोरणाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन उपरोक्त शासन निर्णयाव्दारे शासकीय व इतर कार्यालयांच्या वाहन वापरासंबंधी जे धोरण शासनाने निश्चीत केले आहे त्याआधारे **मजीप्राने निश्चीत केलेल्या वाहन धोरणास एक बदलासह म्हणजेच वाहन चालक भत्ता अनुज्ञेय न करता वाहन चालक मजीप्राच्या आस्थापनेवरील असावा या अटीसह प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे या सुधारीत प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्यात येऊन ते मजीप्राने अमलात आणावे.**

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : कंत्राटदारांच्या नोंदणीचे / नुतनीकरणाच्या निकषांमध्ये कंत्राटदाराने केलेल्या कामाची वार्षिक उलाढाल व हाती असलेल्या कामाच्या रकमेमध्ये शिथीलता देणेबाबत.**

मजीप्रांतर्गत गेल्या ३, ४ वर्षामध्ये निधीच्या कमतरतेमुळे नव्याने निविदा मागविण्याचे प्रमाण कमी झाले असल्याने त्याचा परिणाम कामाच्या प्रगतीवरही झालेला आहे. त्यामुळे कंत्राटदाराच्या नोंदणी तसेच नुतनीकरणाच्या वेळी वार्षिक उलाढाल व हातामध्ये असलेल्या कामांच्या किंमतीबाबतचे निकष पूर्ण होत नाहीत त्यामुळे कंत्राटदारांना पूर्वीच्या नोंदणीपेक्षा खालच्या वर्गामध्ये नोंदणी द्यावी लागत होती यामध्ये शिथीलता देण्यात येऊन याबाबतचे परिपत्रक २२.३.२००४ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. या परिपत्रकानुसार ही शिथीलता ३१.३.२००४ पर्यंतच मर्यादीत करण्यात आलेली आहे. या परिपत्रकाचा फायदा कंत्राटदारांना देता आलेला नाही त्यामुळे ही मुदत ३१ मार्च, २००५ पर्यंत वाढविण्यात यावी म्हणून हा प्रस्ताव शिफारशीसह सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. **या प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन दिनांक २२.३.२००४ च्या परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या शिथीलतेची मुदत ३१.३.२००५ पर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात आली.**

**कार्यक्रम बाब क्र. १० : वसई-विरार उप-प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या... दि. १ एप्रिल, २००४ नंतरच्या होणाऱ्या खर्चावर १४% ऐवजी १०% आस्थापना व अवजारे खर्च लावण्याबाबत.**

रुपये २०८.१९ कोटी किंमतीच्या विषयांकित पाणी पुरवठा योजनेस १४% अस्थापने व अवजारे खर्चासह प्रशासकीय मान्यत मिळालेली आहे. हा आकार १०% करण्यात यावा अशी आग्रहाची मागणी नगरपरिषदे केली असून दिनांक १३.२.२००४ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीमध्ये या मागणीबाबत सर्वकष चर्चा करण्यात येऊन या योजनेवर मजीप्राचा आतापर्यंतचा अस्थापने व अवजारे यावरिल खर्च सुमारे ९.२०% इतका झाल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक ३१.३.२००४ नंतर (म्हणजे दिनांक १.४.२००४ पासून) या योजनेवर होणाऱ्या खर्चावर १०% अस्थापना व अवजारे खर्च लावण्यात यावा असे मा. मुख्य सचिव, यांनी सुचीत केले होते. या प्रस्तावाच्याअनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन उपलब्ध माहिती तपासता योजना निधीच्या निश्चित हमीमुळे मर्यादित कालावधीत पूर्ण होणे आपेक्षित असल्याने एक विशेषबाब म्हणून हा प्रस्ताव स्वीकारार्ह असल्याने तो मान्य करण्यात आला. मात्र या योजनेसाठी विहित वेळेत निधी प्राप्त होईल व योजनेची कामे पूर्ण होतील याची खबरदारी घेण्यात यावी असेही स्पष्ट करण्यात आले. या

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

योजनेवर दिनांक १.४.२००४ पासून पुढे होणाऱ्या खर्चावर अस्थापन व अवजारे खर्चापोटी १४% ऐवजी १०% आकार लावण्यास मान्यता देण्यात आली. या मान्यतेच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात येऊन त्यास मान्यत घेण्यात यावी असेही सुचीत करण्यात आले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. १**

**बीड वाढीव पाणी पुरवठा योजना ( माजलगांव धरण उदभव ) प्रक्रियापूर्व व प्रक्रियोत्तर पाण्याच्या उर्ध्ववाहिनीची कामे दिनांक १५.३.०४पर्यंत पूर्ण करुन जलवाहिन्या कार्यान्वित करणे बाबत :**

बीड शहरातील पिण्याची तीव्र टंचाई पाहता बीड शहराच्या आसपासच्या परिसरात असणारे पाटबंधारे प्रकल्प विचारात घेवुन तातडीच्या पाणी पुरवठा योजना राबविल्यानंतर देखील उपलब्ध होणारे पाणी (किमान तत्वावर वापरुनसुध्दा) जास्तीत जास्त मार्च-२००४ पर्यंत पुरु शकेल त्यामुळे या शहराची पाणी पुरवठयाची मागणी पूर्ण करण्यासाठी टँकर लावावे लागतील मात्र बीड सारख्या सुमारे १.८० लक्ष लोकसंख्येच्या मोठया शहरासाठी ४१ कि.मी. लांब असणाऱ्या माजलगांव धरणावरुन टँकरने पाणी पुरवठा करणे अव्यवहार्य व अशक्य होते कारण ३६० टँकर दिवसातून २ वेळा व तेही माजलगाव धरणावरुन पाणी पुरवठा करण्यासाठी केवळ अशक्य होते व तसेच यावरील खर्च रु. ३ कोटी प्रतिमाह आलाअसता. अशास्थितीत विशेष प्राधान्याने युध्दस्तरावर प्रयत्न केल्यास प्रगतीपथावरील योजनेतील प्रक्रियापूर्व व प्रक्रियोत्तर पाण्याच्या उर्ध्ववाहिनीचे काम पूर्ण करुन त्याव्दारे बीड शहरास पाणी पुरवठा करणे शक्य होईल असे निदर्शनास आल्याने उर्ध्ववाहिनीची कामे १५.३.२००४ पर्यंत पूर्ण करुन त्याव्दारे माजलगाव धरणातील पाणी बीड शहरास पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुसार या जलवाहिनीची कामे पूर्ण करण्यात येऊन दिनांक ५.४.२००४ पासून बीड शहरास दररोज सुमारे १५ द.ल.लि. पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या कामाचे देकार ज्यावेळी प्राप्त झाले होते त्यावेळी बाजारामध्ये मृदू पोलादी पाईप्स पुरवठयाचे जे दर होते त्यामध्ये खुप मोठी वाढ झालेली होती. स्वीकृत निविदेमध्ये मृदू पोलादी पाईप्स पुरवठयाचे जे दर आहेत (रु. २१७१२ प्रति टन ) त्यापेक्षा बाजारामध्ये ११/२००३ पर्यंत सुमारे २७% दरवाढ झाली होती (रु. २७५८६/- प्रतिटन) आंतरराष्ट्रीय स्तरावर मृदू पोलादी प्लेटसची मागणी वाढल्यामुळे ही दरवाढ असावी मात्र काही कालावधीनंतर ही दरवाढ कमी

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

होण्याची शक्यता असली तरी किमान पुढील ६ महिने तरी दर कमी होतील असे वाटत नव्हते. मात्र बीड पाणी पुरवठा योजनेची कामे दिनांक १५/३/२००४ पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य असल्याने दर कमी होतील म्हणून वाट पाहणे शक्य नव्हते. निविदा कलम ५६ नुसार येणारी भाववाढ सुमारे ७ ते १० टक्के येते ही भाववाढ बाजारातील दरवाढ पाहता पुरेशी नसल्यामुळे प्रस्तुत कामे दिनांक १५/३/२००४ पर्यंत पूर्ण करावयाची झाल्यास कंत्राटदारांनी काही वाढीव मागण्या केल्या होत्या. बाजारातील झालेल्या दरवाढी सारख्या प्रतिकूल परिस्थितीत प्रस्तुत कामे मर्यादित साडेचार महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावयाची असल्याने ज्या प्रस्तावास शासनाने दिनांक ५.११.२००३ च्या पत्राव्दारे मान्यता दिली आहे त्या प्रस्तावामधील मुद्यांना मजीप्राच्या संचालक मंडळाने देखील मान्यता द्यावी म्हणून हा प्रस्ताव सादर करण्याचे स्पष्ट करण्यात आले. या कार्यक्रम बाबीमध्ये स्पष्ट केलेल्या सर्व बाबी विचारात घेऊन खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.

१) शासकीय अनुदानापोटी शासनाकडून या योजनेसाठी रुपये २० कोटी विशेष निधी प्राप्त झाला याची नोंदही सभा घेत आहे. तसेच, आवश्यक तो करारनामा नगरपरिषदेशी करण्यात आला असल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेकडून मोरबे प्रकल्पासाठी घेतलेल्या खुल्या बाजारातील कर्जाच्या परतफेडीपोटी प्राप्त रकमेतुन रुपये ९.६४ कोटी निधी या कामासाठी उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. या कर्जाचा कालावधी १२ वर्षाचाअसून व्याजाचा दर १२.७५% आहे. तसेच, या कर्जापोटी १% हमी शुल्क घेण्यात यावे. या कर्जापोटी नगरपालिकेकडून करारनामा केल्यानुसार नगरपालिकेने राष्ट्रीयकृत बँकेत एस्क्रो अकाउंट उघडणे, या अकाउंटमध्ये वेळच्यावेळी रक्कम भरणे व विहीत तारखेस कर्जाची परतफेड नगरपालिकेने करणे बंधनकारक आहे. जर कर्जाची परतफेड नगरपालिका करु शकली नाही तर नगरपालिकेला शासनाकडून जे अनुदान देण्यात येते त्या अनुदानातून कर्जाची रक्कम कपात करण्यास नगरपालिकेने मान्यत दिलेली आहे. या मुद्याच्या अनुषंगाने मजीप्रास्तरावरुन त्यावेळी योग्य ती कार्यवाही करावी असे सूचीत करण्यात आले. त्यामुळे या योजनेच्या रुपये ९.६४ कोटी खुल्याबाजारातील कर्ज वाटपास मान्यता देण्यात आली.

२) दोन्ही जलवाहिन्यांच्या कामासाठी कामाच्या किंमतीच्या ५ टक्के जमवाजमव उचल देण्यात यावी या जमवाजमव उचलीवर १४% दराने व्याजाची आकारणी करावी. ही बाब यापूर्वीच मान्य करण्यात आली आहे. त्यामुळे यानुसार केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

३) पोलादी प्लेटसच्या खरेदीच्या किंमतीवर ८५% सेक्युअर्ड ॲडव्हान्स देणे व ही मर्यादा प्रत्येक कामासाठी एकावेळी ९०० टनापर्यंत ठेवणे व सेक्युअर्ड ॲडव्हान्स पोटी बँकगॅरेंटी ऐवजी इंडिमिनीटी बॉड व तारणखत (Pledge) करुन घेणे या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

४) कंत्राटदाराने केलेल्या कामाची दरमहा दोन देयके अदा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

५) जमिनी खालून पाईप लाईन टाकणेची बाब कार्य क्षेत्रावरील परिस्थितीनुसार मात्र तांत्रिकदृष्टया परिपूर्णता तपासून घेण्यात आलेल्या निर्णयास मान्यता देण्यात आली.

६) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद क्र. २२०, परिशिष्ट क्र.४२ अनुक्रमांक-२१ मधील तरतुदीनुसार दरवाढ झालेल्या निविदेतील कोणत्याही एका बाबीवर म्हणजेच पाईप्स पुरवणाऱ्या बाबी पोटी १०% दरवाढ क्लेम म्हणून देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. ही दरवाढ निविदा कलम-५६ नुसार येणाऱ्या भाववाढी व्यतिरिक्त राहील. यासदेखील मान्यता देण्यात आली.

७) वाढीव कार्य कंत्राट कराची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये असे सूचीत करण्यात आले.

८) अबकारी कराची सवलत याबाबत सर्व गोष्टींचा आढावा घेऊन ही सवलत कंत्राटदारांना न देता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ती या योजनेपोटी ज्याप्रमाणे घेतली त्याला मान्यता देण्यात आली.

९) कामाचे नियोजन व अंमलबजावणी उदिदष्टपूर्ती लक्षात घेऊन या योजनेव्दारे दिनांक ५.४.२००४ पासून पाणी पुरवठा सुरू करण्यात आल्याची विशेष नोंद ही सभा घेत आहे. ही योजना चालविण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा भार नगरपरिषदेने घेणे आवश्यक असल्याने तसे त्यांना अवगत करावे असे सूचीत करण्यात आले.

उपरोक्त चर्चेनंतर कार्यसूचीवर इतर बाब विचारासाठी नसल्याने मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे घोषित केले.

B.Min. 97

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.